CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीश्रीशृंगेरी - जगद्गुरु-

शंकराचार्य - महासंस्थानम्



प. पू. महासंनिधानम्

आद्य-शंकराचार्यः



प. पू. संनिधानम्

लेखकः

पं. वसन्त अनन्त गाडगीळ

शारदा-गौरव-ग्रन्थ-माला, 'शारदा', पुणें १६

मूल्यम् रू. २.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प. पू. महासंनिधानम्

प. पू. संनिधानम्

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आद्य श्रीशंकराचार्य आणि परमपवित्र शृंगेरीपीठ

भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक व तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत आद्य श्रीशंकराचार्य (क्रिस्ताब्द ७८८-८२०) या लोकोत्तर कर्तृत्वाच्या, अलौकिक बुद्धिमत्तेच्या आणि प्रतिभा-शारदेचा वरदहस्त लाभलेल्या महापुरुषानें केलेले अमर कार्य म्हणजेच सनातन, आर्य वैदिक संस्कृतीचें पुनरुज्जीवन आणि स्थिर प्रतिष्ठा. आजच्या जगांत वाक्सम्राज्ञी, मधुरवाणी संस्कृत-भाषा, तिच्या माध्यमातून सर्वांना पवित्रित करणारी– चतुर्वेद, उपनिषदें, गीताभाष्य यांचा अथांग महासागर असणारी – श्रुतिविद्या, कन्याकुमारी-रामेश्वरापासून काशी-पशुपति-नेपाळ-बद्रीकेदारापर्यंत उभ्या आणि द्वारका-सोमनाथ ते जगन्नाथपुरी-गंगासागरापर्यंत आडव्या धाग्यांनी विणलेला तीर्थरूप भारताचा प्रतीक-रूप भगवा ध्वज, तसेच अग्निनारायणाच्या उपासनेमुळें दश-दिशा पवित्रित करणारी यज्ञसंस्था, या सर्व पवित्र, प्रसन्न, मंगल भारतीयतेच्या प्रतीकांची गंगोत्री म्हणून, राष्ट्रिय एकात्मतेचा मूलाधार म्हणून, अद्वैत तत्त्वज्ञानाचे प्रवर्तक म्हणून, भारताच्या भारतीयत्वाचे, हिंदूंच्या हिंदुत्वाचे प्रतीक म्हणून कुणापुढे नतमस्तक व्हायचे असेल तर ती युगप्रवर्तक, राष्ट्रैक्य-संवर्धक लोकोत्तर विभूति आहे जगद्गुरु आद्य श्रीशंकराचार्य.

आज गंगा ही गंगा म्हणून आणि हिमालय हिमालय म्हणून उभा आहे तो त्या थोर विभूतीनें अल्पायुष्यांत अखंड भारताची पदयात्रा, परिक्रमा करून या भारतमातेला ' राष्ट्रमाता ' जगज्जननी, जगदम्बा या स्वरूपांत पाहण्याची, तिची तन-मन-धनानें सेवा करण्याची, तिची अखंडता, एकात्मता अभंग रहावी यासाठीं सर्वस्व-समर्पण करण्याची वृत्ति प्रत्येक भारतीयांत निर्माण व्हावी अशी शिक्षा, दीक्षा दिल्यामुळेंच.

आज भारत जगांत भारत म्हणून, हिन्दु हे हिन्दु म्हणून ताठ मानेनें, तेजस्वितेनें, अस्मितेनें उभे रहात असतील आणि रहाणार असतील तर त्या सर्वांची प्रेरणा, मूलाधार, स्फूर्ति रहाणार आहे राष्ट्रमातेच्या मंदिरांत नंदादीपाप्रमाणें अखंड तेवत राहिलेली शंकराचार्य-प्रणीत ज्ञान-ज्योति. त्यांचा तो धर्म-दण्ड.

बाराशे वर्षांपूर्वी आद्य शंकराचार्य होऊन गेले. १९८८हे त्यांच्या द्वादश-शताब्दीचें वर्ष; परंतु या १२०० वर्षांत त्यांनी स्थापन केलेली दक्षिणेला तुंगा-तीरावर

Sri Vidyabharathi Book Centre, Shringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

शृंगेरी, पश्चिम-सागरतीरावर गोमती तटी द्वारका, उत्तरेला हिमालयाच्या शिखरावर बद्रीनारायणाजवळ ज्योतिष्पीठ आणि पूर्व-सागरतीरावरील जगन्नाथपुरी ही चारही आचार्यपीठें भारताची एकात्मता अखंडित रहावी म्हणून अविश्रान्त उपक्रमशील आजही पहायला मिळतात.

आद्य शंकराचार्यांनी चार दिशांना, चार वेदांसाठीं, चार महावाक्यांची तत्त्वदीक्षा दिलेल्या या चार आचार्य-पीठांपैकी सर्वाद्य आणि प्रधान पीठ आहे श्रीशृंगेरी शारदापीठ. हे जगद्गुरु-महासंस्थानम् परमपूज्य महास्वामींच्या मार्गदर्शनानें भारतांत आज ठिकठिकाणी असणाऱ्या ७९ शाखा-केन्द्रांच्या माध्यमातून आणि देशी-विदेशी विखुस्लेल्या विद्यावान्, तेजस्वी शिष्यांच्या आणि भक्तांच्या माध्यमांतून साऱ्या भारतांत आणि जगतांत आर्य वैदिक सनातन धर्माचा ध्वज फडकत ठेवण्याचें बहुमोल कार्य करीत आहे.

वैदिक धर्मावरचे आघात परतवून, धर्म-वृक्षावर जळमटासारखी वाढणारी विकृतींची बांडगुळे कापून, अज्ञान, भ्रान्ति, निष्क्रियता यांची काजळी झटकून धर्मदीप सदैव प्रकाशमान रहावा यासाठी सुरेश्वराचार्य ते थेट आजचे महास्वामी प. पू. अभिनवविद्यातीर्थमहाराज आणि त्यांचे उत्तराधिकारी प. पू. भारतीतीर्थमहाराज सतत उपक्रमशील असतात.

शृंगेरी शारदापीठाचे केन्द्रस्थान कर्णाटक-राज्यांत तुंगातीरावरील श्रीक्षेत्र-शृंगेरी हे असले तरी सातत्यानें भारताची धर्म-विजय-यात्रा करणारे सर्वच पीठाधीश शृंगेरी श्रीशारदाम्बा-देवतेची ती पुण्याई सर्वांना पहायला, ऐकायला मिळावी, जवळून समजून घेता यावी, यासाठी तत्पर असतात. संस्थान-देवता-परिवारासह त्यांचें दर्शन, पूजन-सेवा करण्याचे भाग्य लाभावे म्हणून भारताच्या कोनाकोपऱ्यांतील प्रजाजन उत्सुक, उत्कण्ठित असतात.

प. पू. महासन्निधानं श्रीअभिनव-विद्यातीर्थ-स्वामी-महाराज हे शृंगेरी-शारदापीठाच्या अखंडित १२०० वर्षांच्या परंपरेतील अनुक्रमाने ३५वे पीठाधीश. प. पू. ब्र. श्रीचन्द्रशेखरभारती-महास्वामींच्या कडून वयाच्या १४व्या वर्षी १९३१मध्यें दीक्षा मिळण्याचें भाग्य त्यांना लाभले. १९५४मध्यें त्यांचा पीठाभिषेक झाला. अखिल भारताची त्यांनी दोन वेळां विजय-यात्रा केली. आद्य शंकराचार्यांनंतर नेपाळ-यात्रा करणारे हे पहिलेच पीठाधीश्वर आहेत. संस्कृत, हिन्दी, तमिळ, तेलगु, कन्नड या सर्व भाषांमधून त्यांची अमृतोपदेश-वाणी ऐकायला मिळालेले स्वतःला धन्य, भाग्यवान् समजतात. सारे राजेरजवाडे, तत्त्व-चिंतक, पण्डित-दिग्गज प. पू. महासन्निधान 'श्री'च्या वैदुष्य, विनय, करुणा, वात्सल्य यांच्या दर्शनाने नतमस्तक

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

झालेले पहायला मिळतात. घनपाठी वैदिक विद्वानांना दीपावलीच्या मङ्गल शुभ-दिवशी प्रतिवर्षी किमान एक लक्ष रुपयांचा रोख पुरस्कार देणारे महासन्निधानं वेदांची, शास्त्रांची परंपरा कशी टिकवावी याच विद्या-चिन्तेनें सतत तळमळतांना आणि ती तळमळ विविध उपक्रमांतून साकार करतांना आढळतात. राष्ट्रपति-पंतप्रधानांपासून राज्यपाल-मंत्रिगणांपर्यंत आणि महापंडितांपासून जिज्ञासु छात्रांपर्यंत सर्वांनाच प. पू. ' श्रीं '-च्या दर्शनाची, दोन शब्द ऐकण्याची ओढ लागलेली पहायला मिळते. ' शृंगेरी ' हे आधुनिक जगाच्या नकाशांत अध्यात्म-विद्येचे प्रबोधन-केन्द्र म्हणून ध्रुवपद ' ध्रुव ' करू शकले ते यांच्याच महात्मतेमुळें.

परमपूज्य भारतीतीर्थ-स्वामी-महाराज ' संनिधानम् ' यांचा जन्म चैत्र शुद्ध षष्ठी, १९५१मधील. उज्जयिनी येथें चातुर्मास्यासाठीं निवास असणाऱ्या प. पू. महासंनिधानं यांची कृपादृष्टि या बटूवर पडली आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली व्याकरण, न्याय, मीमांसा या तीनही शास्त्रांचे सखोल अध्ययन पूर्ण होताच १९७४सालीं त्यांच्यावर संन्यास-दीक्षेची महास्वामींनी कृपा केली. पूर्वाश्रमीचे सीताराम आंजनेय ब्रह्मचारी हे संन्यास-दीक्षेनंतर आजचे प. पू.जगद्गुरु शंकराचार्य श्रीभारतीतीर्थ-स्वामीमहाराज झाले. संस्कृत, तमिळ, तेलगु, कन्नड आणि हिन्दी या सर्व भाषा ते बोलत असले तरी त्यांचे संस्कृत-वक्तृत्व म्हणजे शारदाम्बेचा वीणाझंकार वाटावा इतके मनोरम, श्रवण-रमणीय असते.

महाराष्ट्र आणि शृंगेरी शारदापीठ यांचे संबन्ध इतिहासकालापासून अतिशय जिव्हाळ्याचे, आत्मीयतेचे असे चालत आलेले आहेत. छत्रपति आणि पंतप्रधान पेशवे यांची याबाबतची सुस्पष्ट आज्ञापत्रेहि उपलब्ध असून ती याच पुस्तिकेंत समाविष्ट आहेत. शृंगेरी येथील शंभर वर्षापूर्वीचे रेकॉर्डेहि मराठी भाषेंत आणि मोडी लिपींत उपलब्ध आहे. शृंगेरीपीठाच्या प्रशासक (ॲडमिनिस्ट्रेटर) पदावरहि मराठी मंडळींना ' मानाचें पान ' लाभलेलें आढळले.

महाराष्ट्रांतील श्रीगणेशभक्तांची पंढरी किंवा महाराष्ट्राचे तिरुपति-समान सर्वाधिक भक्त खेचणारे महासंस्थान आहे श्रीमन्त दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपति. या संस्थेच्या विश्वस्तांनीं बुधवार चौकांत श्रीविश्वेश्वर-मंदिरासमोरच श्रीमंगलमूर्तीचे एक टुमदार परंतु सर्वांगसुंदर मंदिर उभे केले आमि त्याचे उद्घाटन करायचे तर ते प. पू. शृंगेरी-शारदापीठाधीश्वरांच्याच हस्ते असा निर्धार करून यासाठी " महाराष्ट्राची विजययात्रा करा " असा शृंगेरी येथें जाऊन हट्टच धरला. त्यांची तळमळीची विनंती मान्य करून प. पू. श्रीभारतीतार्थ महाराज प्रथमच महाराष्ट्रात आले आणि त्यांनी महाराष्ट्र देश जिंकला.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

इचलकरंजी, श्रीक्षेत्र नृसिंहवाडी(पौर्णिमा), मिरज, सांगली, कोल्हापुर, कऱ्हाड, सातारा या दक्षिण महाराष्ट्राच्या पहिल्याच यशस्वी संचारानंतर प. पू. 'श्री' पुण्यांत आले. २६ मार्च १९८४ या त्यांच्या शुभागमनाचे वेळीं पुणेकर भक्तांनीं केलेले त्यांचे उत्स्फूर्त स्वागत, सारसबागेपासून निघालेली ती वैभवशाली शोभा-यात्रा, पुण्यांतील पुणे विद्यार्थी गृहाच्या धनुर्धारी श्रीराममंदिरातील तो आठवडाभर निवास, महानगराच्या विविध भागांतील ते भरगच्च कार्यक्रम, हुतात्मा भगतसिंह-राजगुरु-सखदेव या त्रिमूर्तीला लाहोर-कारावासांत १९३० साली आईच्या मायेनें खाऊ-पिऊ घालणाऱ्या जराजर्जर माउलीची -सौ. यमूताई भाटवडेकरांची- प. पू. 'श्री'नीं घेतलेली भेट, त्यांची सर्वत्र सर्वाकर्षक ठरलेली सुबोध हिंदीतील उद्बोधक अमृतोपदेशपर प्रवचनें हें तर सर्व ऐतिहासिक महत्त्वाचें संस्मरणीय ठरले.

गुढीपाडवा (२ एप्रिल ८४) वर्षप्रतिपदेच्या शुभमुहूर्तावर श्रीमन्त 'श्री'मंदिराचे उद्घाटन करून प. पू. 'श्री' मुंबईला जाऊन आले आणि पनवेल, अलिबाग, पेण, दापोली, चिपळूण, डेरवण, वेळणेश्वर, कुणकेश्वर, रत्नागिरी, राजापुर, आडिवरे, कणकवली, मालवण, सावंतवाडी, दाभोली (वेंगुर्ला), माणगांव (प. पू. वासुदेवानन्द-सरस्वती टेम्बेस्वामीमहाराज यांतें जन्मक्षेत्र) अशी परशुराम-भूमीची विजययात्रा करीत गोमंतकांत गेले.

कोल्हापुर येथें श्रीमहालक्ष्मी मंदिरपरसरांतील श्रीराधेश्याम-कार्यालयांत येऊन श्री. अटलबिहारी बाजपेयी 'श्री'चे हिंदी भाषणानें मन्त्रमुग्ध झाले, करवीरपीठाधीश्वर श्रीशंकराचार्य वात्सल्यपूर्ण सद्भावानें सद्गदित झाले तर मुंबईंत शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे त्यांच्या रसरशीत , तेजस्वी राष्ट्रभक्तीच्या विचारानीं प्रभावित झाले.

प. पू. महासंनिधानं 'श्री'च्या भारतयात्रा अनेकवेळा झाल्या. १९६७ मध्ये (मुंबई-चातुर्मास्य) आणि त्यानंतर एकदोनदा ते मुंबई, पुणे, नगर, औरंगाबाद, नागपुर वगैरे महाराष्ट्राच्या इतर भागांतहि आले परंतु परशुरामभूमि कोंकण, सांगली, कोल्हापुर वगैरे दक्षिण महाराष्ट्राची भूमि त्या विजययात्रेच्या कक्षेंत येऊ शकली नाही. तेव्हा या भागाच्या संचाराची त्यांची इच्छा त्यांच्या उत्तराधिकारी शिष्योत्तमानें नुसतीच पूर्ण नाही केली. त्यांनीं हा सारा परिसर ' ते आले, त्यानीं पाहिले आणि त्यानीं जिंकले ' या उक्तीला शोभोल असा सर्वार्थानीं जिंकला. प्रत्येक ठिकाणीं ' पुनरागमनाय च । ' असा पुन्हा लवकर येण्यासाठीं सर्वानीं त्यांना निरोप दिला.

शृंगेरी शारदापीठाच्या विस्तार-कक्षेंत ' महत्त्वाद् राष्ट्रियत्वात् च ' महाराष्ट्र असणाऱ्या या संतभूमीचें स्थान अढळ झालें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

* * * * *

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीशृंगेरी-शारदा-पीठ-जगद्गुरु-परंपरा

****

		संन्यासः- क्रिस्ताब्दे	समाधिः
१)	श्रीशंकरभगवत्पादः	७८८	८२०
२)	श्रीसुरेश्वराचार्यः	८१३	८३४
३)	श्रीनित्यबोधघनः	८१८	८४८
४)	श्रीघनाघनः	८४६	९१०
५)	श्रीज्ञानोत्तमः	९०५	९५४
६)	श्रीज्ञानगिरिः	९५०	१०३८
७)	श्रीसिंहगिरिः	१०३६	१०९८
८)	ईश्वरतीर्थः	१०९७	११४६
९)	श्रीनृसिंहतीर्थः	११४६	१२२९
१०)	श्रीविद्याशंकरतीर्थः	१२२८	१३१३
११)	श्रीभारतीकृष्णतीर्थः	१३२८	१३८०
१२)	श्रीविद्यारण्यः	१३३१	१३८६
१३)	श्रीचन्द्रशेखरभारती-१	१३६८	१३८९
१४)	श्रीनरसिंहभारती-१	१३८८	१४०८
१५)	श्रीपुरुषोत्तमभारती-१	१४०६	१४४८
१६)	श्रीशंकरभारती	१४२९	१४५५
१७)	श्रीचन्द्रशेखरभारती-२	१४४९	१४६४
१८)	श्रीनरसिंहभारती-२	१४६४	१४७९
१९)	श्रीपुरुषोत्तमभारती-२	१४७२	१५१७
२०)	श्रीरामचन्द्रभारती	१५०८	१५६०
२१)	श्रीनरसिंहभारती-३	१५५७	१५७३
२२)	श्रीनरसिंहभारती-४	१५६३	१५७६
२३)	श्रीनरसिंहभारती-५	१५७६	१६००
२४)	श्रीअभिनवनरसिंहभारती-१	१५९९	१६२३
२५)	श्रीसच्चिदानन्दभारती-१	१६२२	१६६३
२६)	श्रीनरसिंहभारती-६	१६६३	१७०६
२७)	श्रीसच्चिदानन्दभारती-२	१७०६	१७४१

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

२८)	श्रीअभिनवसच्चिदानन्दभारती-१	१७६१		१७६७
२९)	श्रीनरसिंहभारती-७	१७६७		१७७०
३०)	श्रीसच्चिदानन्दभारती-३	१७७०		१८१४
३१)	श्रीअभिनवसच्चिदानन्दभारती-२	१८१४		१८१७
३२)	श्रीनरसिंहभारती-८	१८१७		१८७९
३३)	श्रीसच्चिदानन्दशिव-अभिनवनरसिंहभारती	१८६६		१९१२
३४)	श्रीचन्द्रशेखरभारती-३	१९१२		१९५४
३५)	श्रीअभिनवविद्यातीर्थः	१९३१	.....	
३६)	श्रीभारतीतीर्थः	१९७४	.....	

****

शृंगेरीला जाण्याचा मार्ग

****

मुंबई-पुण्याहून बसने अगर रेल्वेनें हुबळी-हरिहरपर्यंत आणि पुन्हा बसनें शिमोगावरून शृंगेरी. मंगलोरच्या बाजूनें बसनें उडपी-शृंगेरी. मुंबई-पुणे-बंगलोर थेट एस्.टी.नें हरिहरहून शिमोगामार्गे शृंगेरी. मुंबई-पुणे-मंगलोर थेट बसनें उडुपी येथें उतरून बसनें अगुम्बेघाटावरून शृंगेरी. बंगलोरच्या बाजूनें बसनें अगर रेल्वेनें कडूरपर्यंत. तेथून पुन्हा बसनें चिकमंगलूर किंवा तरीकेरेवरून शृंगेरी. बंगलोर ते शृंगेरी थेट एस्. टी.

बंगलोरच्या बाजूनें बसनें अगर रेल्वेनें तीर्थहळळीवरून शृंगेरी.

बंगलोर-मैसूरच्या बाजूनें अगर रेल्वेनें हसन वा अरसीकेरी आणि पुन्हा बसनें चिकमंगलूरवरून शृंगेरी.

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

****

शृंगेरी-मठ-शाखा-केंद्र-सूची

****

उत्तर-भारत –

१ श्रीशंकर-विद्या-केन्द्र, (दूरवाणी - ६७०३८९)
पश्चिमी-मार्ग, वसन्त विहार, न. दिल्ली११००५७

२ श्रीशृंगेरीशंकराचार्य-मठ, भीमगौडा मार्ग, हरिद्वार २४९४०१

३ श्रीशृंगेरीशंकराचार्य-मठ, दारागंज, प्रयाग (अलाहाबाद) २११००६

४ श्रीशृंगेरीशंकराचार्य-मठ, बी १४-१११ केदारघाट, वाराणसी २२१००१
(दूरवाणी - ६३६३४)

५ श्रीराम तारक आन्ध्र आश्रम, बी १४-९२ मानसरोवर, वाराणसी २२१००१

६ श्रीपञ्चगंगेश्वर मठ, पञ्चगंगाघाट, वाराणसी २२१००१

७ श्रीगोपाल विहार (पॅलेस) प्रासादः
बी ३८-२, बरद्वान कोठी महामूरगंज, वाराणसी २२१००१

८ श्रीशृंगेरीशंकराचार्य-मठ, देवघाट, गया ८२३००१

९ श्रीशारदापीठ शंकरहॉल, ९३ सदर्न अवेन्यू, कलकत्ता ७०००२९ (दूरवाणी - ४१-१७१७

आन्ध्र-प्रदेश –

१० श्रीशृंगेरी-जगद्गुरु-शंकराचार्य-महासंस्थानम्
श्रीशारदापीठम्, गोदावरी घाट, राजमहेन्द्री ५३३१०१

११ श्रीशृंगेरीशंकरमठ (दूरवाणी - ६१२८३)
कनकदुर्गा-मन्दिरसमीप, विजयवाडा ५२०००१

१२ श्रीशृंगेरीशंकरमठ, पिनीपाडु, तेनाली ५२२२०१

१३ श्रीशृंगेरी-शंकर-विद्यालयम्, कुञ्चावरम् (गुण्टूर)

१४ श्रीशृंगेरीशंकरमठ, पार्वतीपुरम्, गुण्टूर ५२२००१

१५ श्रीशृंगेरी जगद्गुरु शंकरमठ (तन्त्री-जगद्गुरु, दूरवाणी- ६१९०८)
युनिवर्सिटीमार्गः, नल्लाकुण्डा, हैद्राबाद ५०००४४

१६ श्रीशृंगेरीशंकरमठ, आर् एन् मदा स्ट्रीट, तिरुपति ५१७५०१

१७ श्रीशृंगेरीशंकरमठ, नरसिंह-तीर्थम्, तिरुपति ५१७५०१

१८ श्रीशृंगेरीशंकरमठ, नॉर्थ मदा स्ट्रीट, तिरुमलै ५१७५०४

१९ श्रीशृंगेरी-जगद्गुरु-शंकरमठ, पेस्ट-मदा-स्ट्रीट, तिरुमलै ५१७५०४

२० श्रीशृंगेरीशंकरमठ, उरवकोण्डा (अनन्तपुरम्)

२१ श्रीशृंगेरी-वेदशास्त्र-गुरुकुलम्, रामकृष्णरावपेट, राजमहेन्द्री ५३३१०१

२२ श्रीशृंगेरीशंकरकृपा, ऑफिसर्स-क्वाटर्स एरिया,
नॉर्थ मदा स्ट्रीट, तिरुमलै ५१७५०४

२३ श्रीशृंगेरी-जगद्गुरु-महासंस्थानम् शारदापीठम्, शंकरमठ, श्रीशैलम् ५१८१०१

२४ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, वरंगल ५०६००२

२५ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, नरसरावपेठ ५२२६०१

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मद्र-(तामिळनाडु)-प्रदेश

२६ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, **कल्लिडैकुरुचि ६२७४१६**
२७ श्रीशृंगेरी-जगद्गुरु-शंकरमठ (दूरवाणी - ४४२०४१)
९ वेंकटनारायणमार्ग टी-नगर, **मद्रास ६०००१७**
२८ श्रीशृंगेरीशंकरमठ, ७ कृष्णप्प-नायकम्
अग्रहारं मार्गः, जॉर्ज टाऊन, **मद्रास ६०००२८**
२९ श्रीशृंगेरीजगद्गुरु-प्रवचन-मन्दिरम्
श्रीशृंगेरीमठमार्गः, आर्. के. पुरम्, **मद्रास ६०००२८**
३० श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, सलै स्ट्रीट, **काञ्चीपुरम् ६३१५०१**
३१ श्रीशंकरगुरुकुलम् तथा आचार्यविद्यापीठम्
९७ अम्मा-मण्डपम् मार्गः, **श्रीरङ्गम् (तिरुची) ६२०००६**
३२ श्रीशृंगेरीशंकरमठ, सन्निधि स्ट्रीट, **डिण्डिगल ६२४००१**
३३ श्रीशृंगेरीशंकरमठ, आदिवरम्, **पालानी ६२४६०१**
३४ श्रीशृंगेरीशंकरमठ, टेङ्कैरै, **शोलवंदन (मदुरै) ६२४२१४**
३५ श्रीशंकरमठ, ८८ अम्मान-सन्निधि स्ट्रीट, **मदुरै ६२५००१**
३६ श्रीचन्द्रमौलीश्वर-मन्दिर, **तवतरेण्डल (मदुरै)**
३७ श्रीशृंगेरीशंकरमठ, **मानामदुरै ६२३६०६**
३८ श्रीशृंगेरीशंकरमठ, **रामनाथपुरम् ६२३५०१**
३९ श्रीशृंगेरीशंकरमठ, **देवीपत्तनम् ६२३५१४**
४० श्रीशृंगेरीजगद्गुरु-महासंस्थानम्, शारदापीठम्,
ईस्टकार स्ट्रीट, **रामेश्वरम् ६२३५२६**
४१ श्रीशृंगेरीशंकरमठ, एस्.पी.सन्निधि स्ट्रीट, **वीरवनल्लूर ६२७४२६**
४२ श्रीशृंगेरीशंकरमठ, अम्मानसन्निधि स्ट्रीट, **तिरुनेलवेली ६२७००६**
४३ श्रीशंकरनारायण-सेवाश्रमम्, श्रीशृंगेरीशारदापीठम्,
कृष्णापुरम्, **कडयनल्लूर ६२७७५१**
४४ श्रीशृंगेरीशंकरमठ, **श्रीविल्लीपुथुर ६२६१२५**
४५ श्रीशृंगेरीशंकरमठ, राजा स्ट्रीट, **कोयम्बत्तूर ६४१००१**
४६ श्रीशृंगेरीशंकरमठ, **पेरूर ६४१०१०**
४७ श्रीशृंगेरीशंकरमठ, अग्रहारम्, **सत्यमङ्गलम् ६३८४०१**
४८ श्रीशृंगेरी-जगद्गुरु-शंकराचार्य-महासंस्थानम्,
शारदापीठम्, ९ वेस्ट माडवलगम् मार्गः, **करूर ६३९००१**
४९ श्रीशृंगेरीशंकरमठ, न्यू स्ट्रीट, **इरोड ६३८००१**
५० श्रीशृंगेरीशंकरमठ, ११ भवानीमार्गः, **भवानी ६३८३०१**
५१ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, **गोपीचेट्टीपलयम् ६३८५४२**
५२ श्रीशृंगेरीशंकरमठ, सेकण्ड अग्रहारम्, **सेलम ६२६००१**
५३ श्रीशृंगेरीशंकरमठ, **अत्तूर (सेलम) ६३६१०२**
५४ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, कृष्णस्वामीमार्ग, वेस्ट माम्बलम्, **मद्रास ६०००३३**
५५ श्रीशृंगेरीशंकरमठ, न्यू कॉलनी, **तुतिकोरीन ६२८००३**

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

५६ श्रीशृंगेरीशंकरमठ, सन्निधि, सुन्दरपाड्यपुरम् ६२७८५८
५७ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, अग्रहारम्, कोदुमुडी ६३८१५१
५८ श्रीशृंगेरीमठ, रेसकोर्समार्गः, कोयम्बत्तूर ६४१०१८

कर्णाटक-प्रदेश –

५९ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, कोटेकार (मंगलूर) ५७४१५२
६० श्रीशृंगेरी-जगद्गुरु-शंकरमठ, श्रीनिवासपुरम् ५६३१३५
६१ श्रीशंकरमठ, शंकरपुरम्, बङ्गलोर ५६०००४
(तन्त्री- जगद्गुरु, दूरवाणी- ६०२२७०)
६२ श्रीशंकर स्कूल ऑफ कल्चर, बुलटेम्पल-मार्गः,
११ बसवनगुडी, बङ्गलोर ५६०००४
६३ श्रीशृंगेरीशंकरमठ, १०१-६ वी मेन, मल्लेश्वरम्, बङ्गलोर ५६०००३
६४ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ,
काशीविश्वेश्वरमन्दिरमार्गः, सुलतानपेठ, बङ्गलोर ५६००५३
६५ श्रीशृंगेरीशंकरमठ, बी.एच्.रोड, तुमकूर ५७२१०१
६६ श्रीशृंगेरीशंकरमठ, के.आर्.पुरम् एक्स्टेन्शन, हसन ५७३२०१
६७ श्रीअभिनरशंकरालय, फोर्ट मोहल्ला, मैसूर
६८ श्रीशृंगेरीशंकरमठ, नञ्जनगुड ५७१३०१
६९ श्रीशृंगेरीशंकरमठ, प्रॉपर्टीज्, बेलवडी ५७११०४
७० श्रीशारदामन्दिरशंकरमठ,
शंकरमठमार्ग, बसवनहल्ली, चिकमङ्गलूर ५७७१०१
७१ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, शंकरमठमार्गः, तारीकेरे ५७७२२८
७२ श्रीशृंगेरीशंकरमठ, शंकरमार्गः, शिमोगा ५७७२०१
७३ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, प्रॉपर्टीज्, कोल्लूर ५७६२२०
७४ श्रीशृंगेरीशंकरमठ, भद्रकाली-मन्दिर-संमुखम्, गोकर्ण ५८१३२६
७५ श्रीशृंगेरीशंकरमठ, फातर्पेकर मार्गः, कारवार ५८१३०१
७६ श्रीशृंगेरीशंकरमठ, कोटीतीर्थ मार्गः, गोकर्ण ५८१३२६
७७ श्रीशृंगेरीशंकरमठप्रॉपर्टीज्, सारस्वतपुरम्, धारवाड ५८०००१
७८ श्रीरामेश्वरदेवस्थानम्, हरकेरे (शिमोगा)
७९ श्रीशृंगेरीशारदापीठम्, कलशपुरा,
थमैया चॅरिटीज्, बेलूर ५७३११५

केरल-प्रदेश –

८० श्रीशृंगेरीशंकरमठ, साऊथ स्ट्रीट, फोर्ट, त्रिवेन्द्रम् ६९५००१
८१ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, कालटी ६८३५७४

महाराष्ट्र-प्रदेश –

८२ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ, चेम्बूर, मुंबई ४०००७१
८३ श्रीशृंगेरीशंकराचार्यमठ,
काळाराम-मन्दिर मार्ग, पञ्चवटी, नासिक ४२२००३
८४ श्रीहनुमानमन्दिर, पिम्पळगांव (राहुरी-नगर)

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

शृंगेरी जगद्गुरु महासंस्थानम् यांच्या संग्रहांतील ऐतिहासिक महत्त्वाचे मराठी पत्रव्यवहार

राजे शंभू छत्रपति (१७३८-३९)

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ६५ कालयुक्तिनामसंवत्सरे भाद्रपद शुद्ध पञ्चमी सौम्यवासरे क्षत्रिय-कुलावतंस श्री राजा शंभू छत्रपती यांनी चातुर्वर्ण्य धर्म कुमुदवनी संस्थान विलासपटुतर चन्दिर मारीष देसिक वर्याधिष्ठान शृंगेरीमठ संस्थान यांसी दिले वर्षासन पत्र ऐसेजे श्रीचे पूजा नैवेद्यास हुजूरून प्रतिवर्षी ऐवज नेमून दिला असे बेन प ।।

....संस्थान विदरूरबेन २०० राजेश्री हिंदुराव घोरपडे ममलकत मदारपैकी बेन२००... स बेन रास देविले असते सदरहू, दरसाल प्रविष्ट होईल मठाचे स्वामी आहे ऐवज बिलाकसूर. प्रविष्ट होईल, जाणीजे, निदेश समक्ष.

पण्डित बाजीराव बल्लाळ प्रधान (१७३९-४०)

श्रीमत्परमहंस-परिव्राजकाचार्याद्यनेक-बिरुदाङ्कित-श्रीमन्नृसिंहभारतीगुरु-करकमलसंजात - शृंगेरीश्रीसच्चिदानन्दभारतीस्वामि-यतिवर्य चरणकमलेषु–

छात्रगण-गणनीय पण्डित बाजीराव बल्लाळ प्रधान विदित विनन्ति सहस्रमजस्र विशेष मुक्काम प्रतिष्ठान गंगातीर येथे राजेश्री सुबाराव कोह्हेरराव व रा।। रामचन्द्रभट पुराणिक व मल्हार उद्धव यानीं अग्रपूजा प्रच्यार विषईं विनन्ति केली व पूर्वी एतद्विषईं आज्ञापत्र स्वामीचे सादर जाहले होते त्याजवरून या गोष्टीने सर्वांचे कल्याण व राज्याची अभिवृद्धि असे जाणोन प्रान्त पुणे व प्रान्त जुन्नर व प्रान्त गंगाथडी येथील सकल सत्कर्मारंभी गुरुवाग्रपूजा, स्वामीचे चरणारविन्दी सकलपूजा सनद पाठविली असे. तरी स्वामीनीं प्रतिक्षेत्री नगरी ग्रामी शिष्यवर्ग पाठवून अग्रपूजा घेत गेले पाहिजे. शके १६६१ सिद्धार्थीनाम संवत्सरे.

पेशवे माधवराव बल्लाळ प्रधान (१७६१-७२)

राजश्रिया विराजित राजमान्य राजेश्री त्र्यम्बकराव सिवहो स्वामी गोसावी.

पे ।। माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनन्ति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणो विशेष पैसाबद्दल देणे श्रीशंकराचार्य स्वामी शृंगेरीकर यांस धर्मादाय दरसाल रुपये ३०० तीनशेहे करार करून तुम्हाकडून देविले असति तरी मासिकाजवळ तुम्हाकडील माहाल

Sri Vidyabharathi Book Centre, Sirsi

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असतील त्या माहालीं सदरहु रुपये नेमून देऊन दरसाल स्वामीस निवळ प्रविष्ट करून पावल्याचे कबज घेत जाणे जाणिजे. छ ।। ६सू ।। समान सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनन्ति.

(याचप्रमाणे पे ।। माधवराव बल्लाळ प्रधान यानीं माहादाजी निलकण्ठ (दरसाल ५००), नारो शंकर राजेबाहद्दर (दरसाल रुपये ७५०), गोविन्द हरिस्वामी गोसावी (दरसाल रुपये १५०० दीडहजार) सखाराम भगवन्तस्वामी गोसावी (दरसाल रुपये ४००) इत्यादींना कंसांत दिलेल्या रकमा शृंगेरीश्रीशंकराचार्यस्वामीमहाराजांना पोचविण्याबद्दल आज्ञापत्रे पाठविलेली आहेत.

*****

श्री. फत्तेसिंग गाईकवाड समसेरबहाद्दर

राजेश्री फत्तेसिंग गाईकवाड समसेरबहाद्दर गोसावी यांस.

अखण्डित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री माधवराव बल्लाळ प्रधान आसिर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष श्रीस्वामी शृंगेरीकर हे जगद्गुरु सर्वास पूज्य याची पूजा केलीया श्रेयस्कर हे जाणून तुम्हास हे पत्र लिहिले असे तरी आपले तालुक्यांत ताकीद करून स्वामीचे शिष्य येतील त्यास सकल सत्कमर्शिभीं स्वानीची अग्रपूजा देवीत जाणे जाणिजे छ ।। २२ सावन सू ।। स ।। ईहिदे सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणें.

माहदजी सिन्दे (१७९३-९४)

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमच्छंकराचार्य संस्थान शृंगेरी श्रीसच्चिदानन्दभारती-स्वामीचे शेवेसी.

सेवक माहदजी सिंदे दण्डवत विज्ञापना ऐसीजे. श्रीस्वामीचे दर्शन मौजे वानवडीनजीक कसबे पुणे येथे झाले. ते समई आज्ञा केली की या संप्रदायाचे गुरुवर्यांच्या समाधि व देवस्थान क्षेत्र जनस्थान श्रीपञ्चवटिकेमध्ये आहेत. तेथील संस्थानाच्या खर्चाकरिता कांहीं धर्मादायाच्या पर्याय करून देऊन निरन्तर चालवावे म्हणो त्याजवरून मनास आणितां संस्थानाच्या खर्चाबद्दल धर्मादाय चालविणें श्रेयस्कर जाणून मौजे पिंपळगांव तालुके बेलापुर परगणे संगमनेर येथील खेरीज मोकासा व साहोत्रा करून बाकी अंमल दरोबस्त नि ।। सरकार सालमजकूर सन आर्बा तिसैन शके १७१५ प्रमादीनामसंवत्सरेपासून इनाम श्रीस्वामीस.... देह. एकूण एक गांव खेरीज हिसेदार मोकासी व साहोत्रा व हकदार व इनामदार करून जल तरु तृण काष्ठ पाषाण निधि निक्षेप सहित सरकारांतून करार करून दिला असे. तरी सदरहू मौजे मजकूर आपले दुमाला करून घेऊन तेथील मोकासा व साहोत्रा हकदार व इनामदार खेरीज करून बाकी सरकार अंमल दरोबस्त इनाम धर्मादाय संस्थान मजकूरच्या खर्चाबद्दल शिष्यपरंपरा अनुभवीत जावा. ता. छ. २१ माहे सफर सू. सन आर्बा तिसैन मया अलफ. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

*****

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कलेक्टर व माजिस्त्रेट जिल्हा धारवाड

अजम अलेक्जॅण्डर निसबट खांसाहेबबहादूर कलेक्टर व माजिस्त्रेट जिल्हा धारवाड याणी.

दस्तक बेसमी मामलेदारा व माहलकरी व जिल्हेचे कारकून व जाहगिरदार व गांवगत्रेचे पाटील कुलकर्णी व सायरचोकीदारा व सरहद्दघाटी रखवालीदारा वगैरे यांस कळावे कि, श्रीशृंगेरी नरसिंहभारतीस्वामी याणीं नासीक पञ्चवटी द्वारका कुरुक्षेत्र जगन्नाथ बद्रिकाश्रम व कासी वगैरे पुण्यक्षेत्र यात्रार्थ शृंगेरीहून निघून सिवमोगा होनाळी हरिहर वगैरे मागनिं जाऊन येतात. त्यांस मामूल प्रमाणे मर्यादा केले पाहिजे. त्यांस व त्यांचे समुदायास मिळवून दिले सामानांस त्यांणी किंमत दिले ते पहावे. श्रीस्वामीस याजबरेबर असणेचे. –

७ हत्ति, २० उंट, २० पालखी, २०० घोडी, २०० वोझेचे बैल, ५० बंदुका, ५० तलवार, ५० भाले, २० कटारी, ५०० ब्राह्मण, ३०० शूद्र याखेरीज छत्र चामर वगैरे बिरद सहित आहे. स्वामी यास उपद्रव न करितां जाऊं द्यावे. ता. १८ माहे जुलई इ. मु. स. १२५२ फसली शके १७६४ शुभकृतनामसंवत्सर आषाढ शु ।। ११ मु ।। धारवाड.

शृंगेरी मठ मुख्य, संकेश्र वर नव्हे

वेदशास्त्रसंपन्न राजश्री नागेश्वरशास्त्री मुख्त्यार श्रीमत् जगद्गुरु श्रीशंकराचार्य महाराज मठ शृंगेरी.

साष्टाङ्ग नमस्कार विनन्ति विशेष. ग्वाल्हेर संस्थानांत संकेश्वरमठाची अधिकार आहे म्हणोन मुख्त्यार मठ मजकूर याची दरखास्त आल्यावरून कारखान्याकडे पाठविता जबाबी पत्र नम्बर २१ संवत १९४९ चे पूर्वी शृंगेरी मठचे अधिकारी येथे आल्यावेळी त्याचें पूजन होऊन कागद करून देण्यात आले म्हणून कौन्सलात पेष होऊन शृंगेरी मठ पूर्वी मुख्य मानल्याप्रमाणे कायम समजावे. संकेश्वर-मठाकडून अधिकारीचे म्हण्णे बरोबर नाहीं म्हणोन हुकुम जाहल्याप्रमाणें कारखानाकडेस पत्र नम्बर १२ संवत १९५० चे लिहून गेले ते आपणांस कळावे. कळावे बहुत काया लिहिणे लोभ करावा ही विनन्ती.

तारीख २२ माहे अक्टूबर सन १८९४ ईसवी संवत् १९५१ द. रघुनाथराव यादव, सेक्रेटरी कौन्सिल ऑफ रिजन्सी.

*****

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीशृंगेरी-शारदा-पीठम्..... कार्यविस्तार

१ **आध्यात्मिक** – शृंगेरी शारदापीठाचे विद्यमान उभय जगद्गुरुमहाराज हे भारतांतील आणि विदेशातील असंख्य मुमुक्षु, जिज्ञासु तत्त्वचिन्तकांचे आश्रयस्थान आहेत.

२ **शैक्षणिक (वेद-विद्या)** – शृंगेरी, बंगलोर, कालटी, नञ्जनगुड, रामेश्वर, विजयवाडा यांसारख्या अनेक ठिकाणी निःशुल्क वसतिगृह, भोजन-शाळा, समृद्ध ग्रन्थालय यांची जोड असलेल्या वेद-पाठशाळा, संस्कृत महाविद्यालये चालविली जातात. छात्रांना शिष्यवृत्त्या दिल्या जातात. प. पू. महासन्निधानम् महाराजांच्या वर्धन्तीचे दिवशी (नरक-चतुर्दशी) प्रतिवर्षी वैदिक विद्वानांना वेद-पोषक-सभा-द्वारा हजारो रुपयांची रोख संभावना आणि स्वाध्यायी छात्रांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यासाठी लाखो रुपये खर्च केले जातात.

३ **शास्त्र-रक्षण** – न्याय-मीमांसा, व्याकरण, ज्योतिष आणि वेदान्त या शास्त्रांच्या रक्षण-संवर्धनासाठी पाठशाळा, महाविद्यालये यांचे संचालन उच्च अभ्यासासाठी शिष्यवृत्त्या आणि प्रतिवर्षी गणेशोत्सवांत गणपति-वाक्यार्थ-सभेचे संयोजन करून भारताच्या विविध भागांतून निमंत्रिलेल्या शास्त्र-निष्णात पंडितांना रोख पुरस्कार दिले जातात.

त्याचप्रमाणे वैशाख महिन्यांत आद्य शंकराचार्य जयन्त्युत्सवानिमित्त पाच दिवस विद्वत्-सभा भरवून उभय श्रींच्या उपस्थितींत शास्त्र-चर्चा होते आणि सहभागी विद्वानांचा उचित गौरव करण्यात येतो.

४ **सुर-सरस्वती-सभा** – संस्कृत-प्रचारासाठी प. पू. श्रींनी स्थापन केलेल्या सभेतर्फे परीक्षा घेऊन प्रमाण-पत्रे दिली जातात. उत्कृष्ट छात्रांना पारितोषिके देण्यात येतात. (संपर्क कार्यालय – १०३ आय् ब्लॉक, राजाजीनगर, बंगलोर – ५६००१०).

५ प्रतिवर्षी दीपावलीत प. पू. श्रींच्या वर्धन्ती-महोत्सवांत धर्म-साहित्य-संमेलनाचे आयोजन होते.

६ **प्रकाशने** – तमिळ (श्रीरंगम् त्रिची) तेलगु (हैद्राबाद) आणि कानडी (मैसूर) या तीन भाषांतून श्रीशंकरकृपा हे मासिक तसेच मुंबईहून तत्त्वालोक हे इंग्रजी द्वैमासिक चालविले जाते. यांतून हिन्दु तत्त्वज्ञान व संस्कृति-विषयक उत्कृष्ट साहित्य प्रकाशित केले जाते.

[**'तत्त्वालोक'**-५ श्रद्धानंद हाऊस, श्रद्धानंदमार्ग, माटुंगा, मुंबई ४०००१९]

' शारदा ' हे पुण्याहून गेली ३० वर्षे भारतातील एकमेव संस्कृत-पाक्षिक प. पू. श्रींच्या आश्रयानेच **पं. वसन्तराव गाडगीळ** यांच्या संपादकत्वानें प्रकाशित होते.

[**'शारदा'-कार्यालय,** झेलम, पत्रकारनगर, पुणें ४११०१६ (दूरवाणी-३३२१२४)]

७ **संशोधन** – वेदमन्त्रांचा मानवी शरीरावर होणारा परिणाम तसेच जागृति, स्वप्न, सुषुप्ति यावर उभय श्रींच्या मार्गदर्शनाखाली संशोधन चालू आहे.

८ **रुग्णालय** – शृंगेरीत सर्व साधन-सोयींनी सुसज्ज असे सुमारे २ कोटी रुपये खर्चून 'श्रीं'नीं उभें केलेलें **श्रीशारदाम्बा-धन्वन्तरी हॉस्पिटल** हा रुग्णांचा फार मोठा आधार आहे.

९ **धर्मशाळा** – शृंगेरीत नित्य येणाऱ्या यात्रिकांसाठी शंकरकृपा, शंकर-निकेतन, जयशंकर-निकेतन, भक्तनिवास, मंदिर इत्यादि सर्व सोयींनी सुसज्ज धर्मशाळा आहेत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

शृंगेरी-द्वारका-ज्योतिष्पीठाचार्य-स्वीकृता शासन-पुरस्कृता कविप्रिया

झेलम, पत्रकारनगरी, पुणें ४११०१६ (दूरवाणी - ३३२१२४)

कृपया -

सत्वरं प्रेष्यतां शारदा-वार्षिकं मूल्यम् रू. २५.

- व्यवस्थापिका

संपादकः मुद्रकः प्रकाशकः स्वामी-वसन्त अनन्त गाडगीळ बी.ए.बी.एड्.
मुद्रण-स्थलम्-श्रीशारदा-मुद्रण-सिद्धि-मन्दिरम्
प्रकाशन-स्थलम्-शारदा, २ झेलम, पत्रकारनगरम्, पुणे ४११०१६.
(दूरवाणी - ३३२१२४)

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri